जनहित शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी द्वारा संचालित

# गोविंदराव वारजुकर

# कला - वाणिज्य महाविद्यालय व पदव्युत्तर अभ्यास केंद्र

नागभीड - ४४१ २०५ , जि. चंद्रपूर

NAAC द्वारा मानांकित 'B+' (CGPA: 2.74) श्रेणी




Website: http://www.gwcollegenagbhid.ac.in
E - mail: princ_gwcn@rediffmail.com

## माहितीपत्रक व मार्गदर्शिका
## २०२६ - २७

# जनहित शिक्षण संस्था, ब्रह्मपुरी र.नं. महा ७०८४ (चं.)

## कार्यकारी मंडळ



अध्यक्ष
प्रा. डॉ. एन. जे. चव्हाण



उपाध्यक्ष
प्रा.डॉ. आर. पी. जयस्वाल



सचिव
प्रा. एम. पी. सुपले



सहसचिव
श्री. आर. आर. वारजुकर



सदस्य
प्राचार्य डब्ल्यू. व्ही. पाटणकर



सदस्य
डॉ. एस. आर.सिंग



सदस्या
श्रीमती जे. व्ही. महाजन



सदस्या
श्रीमती व्ही. डब्ल्यु. भांडारकर



सदस्य
डॉ. यु. एन. कोराने



सदस्य
श्री. आर. पी. घाटे



सदस्या
श्रीमती ए. पी. कोटीया



## प्राचार्य डॉ. संजय सिंग

गोविंदराव वारजुकर कला-वाणिज्य महाविद्यालय व पदव्युत्तर अभ्यास केंद्र,नागभीड जि. चंद्रपूर

## आमचे आश्रयदाते



स्व. गोविंदरावजी वारजुकर



स्व. शंकररावजी येरणे



गणराज्यदिनी ध्वजारोहण करताना बीकॉम भाग १ ची विद्यार्थिनी
कुमारी सानिया रवी मोहुर्ले व स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण करताना
महाविद्यालयातील सर्वोच्च गुण प्राप्त विद्यार्थी कुमारी नेहा रमेश बोरकर




स्वर्गीय प्रा. प्र. कृ. सुपले स्मृती व्याख्यान तसेच
'मी जिजाऊ बोलतेय' यावर एकपात्री प्रयोग



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम




दीक्षांत समारोह



मोफत गणवेश वितरण




एस.टी बस पास वितरण



जागतिक योग दिन कार्यक्रम




गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ




वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित
औद्योगिक अभ्यास प्रकल्प



महिला अध्ययन व सेवा केंद्र च्या वतीने
आयोजित पोस्टर्स व मेहंदी स्पर्धा



महाविद्यालयात आयोजित स्पर्धा परीक्षा




वृक्षारोपण





रा.से.यो विभागाच्या वतीने दत्तक ग्राम किटाळीयेथे
आयोजित मोफत नेत्रतपासणी शिबिर





विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर



नवागतांचे स्वागत समारंभ



चंद्रपूर जिल्हा विभाग कनिष्ठ महाविद्यालय
स्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा




विद्यार्थी स्वयंसेवकाद्वारे नगर स्वछता मोहीम

# यशस्वी चेहरे आमचे अभिमान



महाविद्यालयातील बी. ए. भाग. ३ चा विद्यार्थी
विवेक धनराज मशाखेत्री याची SRPF मध्ये निवड



महाविद्यालयातील माजी विद्यार्थी मयूर मेश्राम
याची RBI Grade B अधिकारी म्हणुन निवड



महाविद्यालयातील माजी विद्यार्थी
शिवा कावळे याची SRPF मध्ये म्हणुन निवड




महाविद्यालयातील बी. ए. भाग 3 चा विद्यार्थी
विजय संजय दहिवलकर याची सिक्कीम येथे होणाऱ्या National Strength Lifting Competition 2026 स्पर्धेकरिता निवड




महाविद्यालयातील बी. ए. भाग 2 चा विद्यार्थी
सन्मय प्रमोद जक्कनवार याची राज्य गणतंत्र दिवस परेड 2026 करिता निवड

# गोविंदराव वारजुकर कला वाणिज्य महाविद्यालय व पदव्युत्तर अभ्यास केंद्र

## नागभीड, जि. चंद्रपूर

## महाविद्यालय विकास समिती

| | नाव | पद |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. एन. जे. चव्हाण | अध्यक्ष (संस्थाध्यक्ष) |
| २ | प्रा. एम.पी. सुपले | सदस्य (संस्था सचिव) |
| ३ | प्रा. डॉ. व्ही. एन. कायंदे | सदस्य (विभाग प्रमुख) |
| ४ | प्रा. डॉ. आर. आर. रणदिवे | सदस्य (अध्यापक प्रतिनिधी) |
| ५ | प्रा. डॉ. व्ही. एन. बनकर | सदस्य (अध्यापक प्रतिनिधी) |
| ६ | प्रा. डॉ. कु. एन. यु. मिश्रा | सदस्य (अध्यापक महिला प्रतिनिधी) |
| ७ | श्री. डब्ल्यू. टी. निहीटे | सदस्य (अध्यापकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी) |
| ८ | प्रा. डॉ. आर. पी. जयस्वाल | सदस्य (संशोधन) |
| ९ | प्राचार्य व्ही. डब्ल्यू. पाटणकर | सदस्य (शिक्षण) |
| १० | श्री. रोहीत वारजुकर | सदस्य (उद्योग) |
| ११ | श्री. कल्पेश जे. पटेल | सदस्य (समाजसेवा) |
| १२ | प्रा. डॉ. डी. एन. मोरांडे | सदस्य (समन्वयक I.Q.A.C.) |
| १३ | प्रा. डॉ. एस. आर. सिंग | पदसिध्द सचिव (प्राचार्य) |

# महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- बी.ए., बी.कॉम. (मराठी व इंग्रजी माध्यम), एम.ए. (मराठी), एम.ए. (समाजशास्त्र), व एम. कॉम. शिक्षणक्रम.
- सुसज्ज इमारत, ग्रंथालय, प्रयोगशाळा, व्यायामशाळा, आणि तज्ञ अनुभवी प्राध्यापक.
- NRC च्या व्दारे विनामूल्य इंटरनेट सुविधा.
- नियमीत रोजगाराभिमुख सर्टिफिकेट शिक्षणक्रम.
- मुलींचे वसतीगृह (वसतीगृहामध्ये प्रवेश घेण्यास ईच्छूक विद्यार्थीनींनी प्रा. डॉ. कायंदे यांचेशी संपर्क साधावा.)
- राष्ट्रीय सेवा योजनेचे उत्कृष्ट पथक, पदव्युत्तर शिक्षणाची सोय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र, भूगोल व गृहअर्थशास्त्राच्या स्वतंत्र प्रयोगशाळा, स्वतंत्र सभागृह, स्वतंत्र विद्यार्थिनी कक्ष, क्रिडांगण, Career Guidance Center इत्यादी बाबतच्या खास संधी या महाविद्यालयात उपलब्ध आहेत.

**Admission Committee Core Group**

| | | |
|---|---|---|
| Dr. Deepak Morande | (Coordinator) | 7774932732 |
| Dr. Ravindra Randive | (Member | 7767842112 |
| Dr. Nikita Mishra | (Member) | 9970406183 |
| Dr. Vijay Bankar | (Member) | 8605608358 |

**Note :- Parents/Students may feel free to contact the core group members in connection with admission related matters.**

# VISION OF THE COLLEGE

**Providing a comprehensive development of socially disadvantaged backward class dominated region through dissemination of knowledge in the branches of Arts, Social Science and Commerce and providing the new generation of the region with enriching opportunities for an all-round personality development and inculcation of sound value system.**

# GOALS AND OBJECIIVES OF OUR COLLEGE

- *Impetus to provide higher education to the marginalized and the rural masses in this backward area.*
- *To strive for dissemination of existing knowledge.*
- *To provide opportunities for all round development of personality of students.*
- *To propagate the necessity of human, moral and ethical values in life.*
- *To orient the students for development of practical skills.*

# ।। विद्या परम् दैवतम् ।।

## जनहित शिक्षण संस्था ब्रम्हपुरी व्दारा संचालित
## रजि. नं. एफ ८८६ (चं.)
## महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
## नॅक व्दारा "B+" मानांकन प्राप्त
## (2.74 CGPA)

# गोविंदराव वारजुकर कला वाणिज्य महाविद्यालय व पदव्युत्तर अभ्यास केंद्र
## नागभीड, जि. चंद्रपूर
## (स्थापना - १९८६)

शिक्षण हा एक महत्वाचा राष्ट्रीय उपक्रम असून कोणत्याही राष्ट्रीय कार्यक्रमाचा कणा आहे. हे मर्म ओळखून अध्यापन व अध्ययनाच्या क्षेत्रात गुणवत्ता वाढविण्याचे कार्य शिक्षकानेच केले पाहिजे, या जबाबदारीच्या जाणिवेतून जनहित शिक्षण संस्थेचा जन्म झाला.

ब्रम्हपुरी हे शिक्षणाचे माहेरघर, पण जवळच राजमार्गावरील नागभीड मात्र उच्च शैक्षणिकसोयीपासून वंचित. ही उणीव 'जनहित' ला जाणवली आणि संस्थेचे आपले पाऊल नागभीडला कला व वाणिज्य महाविद्यालय असावे म्हणून टाकले. नागपूर विद्यापीठाने संस्थेच्या संकल्पाला स्वीकृती दिली. नागभीड आणि परिसरातील जनतेला पाल्यांचे शैक्षणिक हित साधण्याची संधी जनहितने उपलब्ध करून दिली.

प्राध्यापकांनी संघटीत होऊन शिक्षण संस्था काढावी आणि जनसामान्यांच्या शैक्षणिक हिताची दखल घ्यावी ही बाब स्पृहणीय व अभिनंदनीय वाटल्यामुळे मोहाळीचे श्रीमान रिध्देश्वरराव वारजुकर पाटील जनहित परिवारात सामील झाले. लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र आल्याने जनहितचे वैभव वाढले.

बऱ्याच वर्षापासून थांबलेला नागभीडचा शैक्षणिक विकासाचा रथ उच्च शिक्षणाच्या मार्गाने आता चालायला लागला आहे. जनता जनार्दनाच्या सहकार्याने त्याचा वेग विकसित होईल ह्या विश्वासाने वाटचाल सुरु झाली. महाविद्यालयाची निकोप वाढ नागभीड परिसरात भूषणावह ठरेल अशी श्रध्दा वाठीस लागली . विद्यार्थ्यांचे उज्ज्वल निकाल व पालकांची व्यापक अपेक्षा आम्हाला शैक्षणिक आव्हाने आणि आवाहने पेलायला बळ देईल अशी खात्री आहे. अनेक प्रतिकूल परिस्थितीवर मात करून महाविद्यालयाची स्वयंपूर्णतेकडे जाण्याची ध्योयासक्ती घेऊन विशाल, व्यापक होण्याची धडपड सुरू आहे. केवळ अभ्यासक्रमांची पूर्ती म्हणजे सर्वांगीण शिक्षण नव्हे, हे ध्यानात घेऊन महाविद्यालयाची स्वतःची सर्व समावेशक इमारत असावी व विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबत विकास साधना यावा यासाठी संस्था सक्रिय झाली.

जनहित हे केवळ संस्थेचे नाव नाही तर स्वभाव आहे, जे जनशक्तीने ओळखले तर स्वप्नांना मूर्तव्हायला फार वेळ लागत नाही, असा आमचा विश्वास आहे. या विश्वासाला मूर्त रूप प्राप्त झाले ते दिनांक २८ जून १९९० ला. नागभीडातील माजी सरपंच व प्रतिष्ठित व्यापारी श्री शंकरराव गणपतराव येरणे यांनी स्वयंस्फूर्तीने, निःस्वार्थ भावनेने शिवनगर परिसरातील दोन एकर शेतीची जागा महाविद्यालयासाठी संस्थेला स्व. गणपतरावजी गोमाजी येरणे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दान दिली. यामुळेच महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत आकाराला येऊ शकली. त्यानंतर या ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांच्या चौफेर व्यक्तिमत्व विकारासाठी शक्य तितक्या सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न राबविला गेला. फलस्वरूप आज महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच कर्मचारी यांच्यासाठी विनामूल्य इंटरनेट सुविधा पुरविणारे नेटवर्क रिसोर्स सेंटर, विपूल ग्रंथसंपदा असलेले ग्रंथालय, प्रशस्त वाचक कक्ष, संगणीकृत प्रशासकीय विभाग इत्यादी सोयी निर्माण केल्याचे समाधान

सन २००४ आणि सन २०११ मध्ये राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (NAAC), बंगलोर व्दारा महाविद्यालयाचे मूल्यांकन करून राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाला "B" श्रेणी प्राप्त झाली. सन २०१७ मध्ये नॅक च्या पुनर्मुल्यांकन प्रक्रियेत राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाला "B++ " श्रेणी प्राप्त झाली. गुणवत्तेचा ध्यास घेऊन, अल्पसमाधानात न रमता सातत्याने सुरू ठेवलेल्या परिश्रमामुळे आलेल्या आत्मविश्वासातूनच सन २०२४ मध्ये NAAC च्या पुनमुल्यांकन प्रक्रियेला सामोरे गेलो व राष्ट्रीय स्तरावर "B+" (2.74 CGPA) श्रेणी प्राप्त झाली. या भागात पुनर्मुल्यांकनासाठी (Fourth Cycle) सामोरे जाणारे पहिले महाविद्यालय असल्याने आम्हाला अभिमान वाटते. आजवर प्राप्त झालेल्या यशोधारा आमच्या सर्व मेहनतीला अर्थ देऊन पुढील प्रयत्नांसाठी प्रोत्साहीत करणारी  ऊर्जा ठरणार याबद्दल आम्ही आश्वस्त आहोत.

धन्यवाद

प्रा. एम. पी. सुपले.
सचिव.
जनहित शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी.

प्रा. डॉ. एन. जे. चव्हाण.
अध्यक्ष.
जनहित शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी.

# ॥ महाविद्यालयाचा कार्यवृत्तांत ॥

सन १९८६ साली स्थापन झालेल्या गोविंदराव वारजुकर महाविद्यालयाने ग्रामीण भागात उच्चशिक्षण प्रदान करणारी एक उल्लेखनीय संस्था म्हणून लौकिक प्राप्त केला आहे. बी.ए., बी.कॉम.(मराठी व इंग्रजी माध्यम), एम.ए. (मराठी), एम.ए. (समाजशास्त्र), एम.कॉम. या शिक्षणक्रमांच्यामाध्यमातमन नागभीड सारख्या ग्रामीण परिसरातील युवक युवतीचे उच्च शिक्षणाचे स्वप्न साकारकरण्यासाठी हे महाविद्यालय सतत प्रयत्नशील असते. या शिवाय **Skill Based Short TermCourses** सुरू करण्यात आलेले आहेत. अध्ययन अध्यापनासोबतच अभ्यासेत्तर उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास साधण्याची दृष्टी बाळगूण विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले जाते.

पारंपारिक अध्यापन पध्दतीसोबतच महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीचा अवलंब करून **Zoom, Google Meet, Webex** इत्यादी माध्यमांचा वापर अध्ययन अध्यापनाचे कार्य अधिक प्रभाविपणे राबविले जाते. त्याच बरोबर विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन चर्चा सत्र, कार्यशाळा व मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येते.

**Curricular & Co-Curricular Activities :-**

विद्यापीठाव्दारे लागू केलेल्या अभ्यासक्रमाच्या नियमीत शिकवणीसोबतच विद्यार्थ्यांमध्ये संबंधीत विषयाचे सखोल व व्यापक ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी आमच्या महाविद्यालयात विविध विषयांचे विद्यार्थी 'अभ्यासमंडळ' स्थापन करण्यात आली आहेत. त्यात प्रामुख्याने भाषा अभ्यास मंडळ, भूगोल अभ्यास मंडळ, समाज विज्ञान अभ्यास मंडळ व नॉलेज कमांडोज क्लब या अभ्यास मंडळांच्या माध्यमातून अभ्यासक्रमावर आधारीत विशेष व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादींचे आयोजन केले जाते. भूगोल विभागाच्या वतीने दरवर्षी 'भुगोल दिना' च्या निमित्त्याने पर्यावरण क्षेत्रातील नामवंत विचारवंतांना व्याख्यानाकरीता पाचारण केले जाते. ग्रामीण भागातील महिला विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणक्रमाचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन आमच्या महाविद्यालयाचे गृह अर्थशास्त्र हा विषय सन १९९५ पासून सुरु केला. या विषयाचे उद्दिष्ट मानवी जीवन सुखी व समृध्द, सुव्यवस्थित, स्वास्थप्रद आकर्षक बनविण्याच्या क्षमतेच्या कौशल्याचा विकास करणे आहे. महाविद्यालय विद्यार्थीनींच्या सृजनात्मक कलेला वाव देण्यास सतत प्रयत्नशिल असते. यातून विद्यार्थीनी विविध कलेत निपून होऊन भविष्यात अनेक स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून घेऊ शकतात. महाविद्यालयातून गृहअर्थशास्त्र अभ्यासक्रमातून विषयाचे सादरीकरण, पुष्परचनेचे विविध प्रकार, गालीचा, वर्गकाम, विविध प्रकारची कृत्रीम फुले, विणकाम, शिवणकाम इ. शिक्षण प्रात्यशिकातून दिले जाते. गृहअर्थशास्त्र विषयात अनेक कार्यशाळातून विद्यार्थीनींना लघु उद्योगाचे प्रशिक्षण दिले जाते. महाविद्यालयातील विविध आधुनिक उपकरणांनी सुसज्जीत प्रयोगशाळा विद्यार्थीनींना उपलब्ध करून दिली जाते. प्रशिक्षित माजी विद्यार्थीनींकडून केकचे, आईस्क्रीम, रांगोळीचे विविध प्रकार तसेच तज्ञ प्रशिक्षितांना आमंत्रित करून वॉशिंग पावडर, भांड्याचे पावडर, फिनाईल बनविणे इ. प्रशिक्षण कार्यशाळेतून स्वयंपूर्ण बनविण्याकरीता मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

संशोधन हे अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील महत्वपूर्ण घटक आहे. या जाणिवेतून महाविद्यालय प्राध्यापक वर्गाला संशोधन कार्यासाठी नेहमी प्रोत्साहन देतो. सद्यस्थितीत महाविद्यालयातील सर्व नियमित प्राध्यापकांनी पीएच.डी. प्राप्त केली आहे. त्याचबरोबरच ७ प्राध्यापक विद्यापीठाचे मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक आहेत व त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक संशोधक कार्य करीत आहेत. यु.जी.सी. दिल्ली व्दारा मान्यता प्राप्त लघू संशोधन प्रकल्प सुध्दा आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी पूर्ण केले आहेत. मागील ५ वर्षात महाविद्यालयाच्या प्राध्यापकांव्दारे ३१ रिसर्च पेपर्स **UGC CARE LISTED** व ५३ रिसर्च पेपर्स विविध राष्ट्रीय /आंतराष्ट्रीय **Journals** मध्ये प्रकाशित झाले आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व विषयांचे प्रकल्प दिले जातात. सत्राच्या शेवटी विद्यार्थी प्रकल्प अहवाल आपल्या विषयाशी संबंधीत प्राध्यापकांकडे सादर करतात.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख करण्यासाठी महाविद्यालयाच्या रोजगार प्रशिक्षणमार्गदर्शन केंद्राच्या वतीने प्रतिष्ठीत संस्थांच्या मार्गदर्शनाखाली व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन सत्रांचे आयोजन केले जाते.

**'Gender Equity'** च्या संदर्भात महाविद्यालयातील **'INTERNAL COMPLAINT COMMITTEE '** व ' महिला अध्ययन केंद्र' च्या वतीने विविध मार्गदर्शन सत्र उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन दृष्टी निर्माण व्हावी याकरीता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व्दारे दरवर्षी आयोजीत केल्या जाणाऱ्या 'अवष्किार' स्पर्धेत विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यास प्रोत्साहीत करण्यात येते. त्याबरोबरच भूगोल, समाजशास्त्र या विषयातील विद्यार्थ्यांना **'Socio-Economic Survey'** महाविद्यालयात सुरु केल्या गेले आहेत. परंपरागत शिक्षणक्रमासोबतच व्यवसायाभिमुख व कौशल्याभिमुख लघूअभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थी आपली रोजगार क्षमता वाढवू शकतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा बौध्दिक स्तर लक्षात घेऊन महाविद्यालयाव्दारे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मोफत **Remedial Coaching Classes** आयोजीत केले जातात.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक चे अभ्यासकेंद्र :-

नागभीड सारख्या ग्रामीण परिसरातील लोकांमध्ये उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याचे उद्दिष्ट बाळगून कार्यरत असणाऱ्या आमच्या महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे अभ्यासकेंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रामध्ये प्रामुख्याने बी. ए. व बी. कॉम. हे शिक्षणक्रम राबविले जातात. नोकरी, उद्योग व व्यवसायात असणारे बहुसंख्य लोक पारंपारिक विद्यापीठातील उच्च शिक्षणाचे शिक्षणक्रम घेऊ शकत नाही. आपल्या तालुक्यात असणाऱ्या अशा प्रकारातील लोकांना त्याच्या नियमित कार्याला बाधा न पोहचू देता उच्च शिक्षणाचा प्रवास करता यावा, या हेतूने हे अभ्यास केंद्र सुरू करण्यात आले. याचीच फलश्रृती म्हणजे आज आमच्या महाविद्यालयात प्रत्येक रविवारी केंद्रामध्ये आयोजित मार्गदर्शन सत्रासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित असतात. यापुढे तालुक्यातील जनतेसाठी अल्पकालावधीचे अन्य व्यवसाय प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रम सुरू करण्याचा आमचा मानस आहे. समाजाच्या सर्व घटकांपर्यंत उच्च शिक्षणाचे फळ पोचावे ह्या आमच्या महाविद्यालयाच्या प्रयत्नांना मिळालेल्या सकरात्मक प्रतिसादातून नक्कीच ह्या अभ्यासकेंद्राचा प्रवास कल्याणकारी होईल याची आम्हाला खात्री आहे.

## खेळ व क्रिडा विभाग :-

महाविद्यालयाच्या खेळ व क्रिडा विभागाच्या वतीने या क्षेत्रात नैपुण्या प्राप्त करावे यासाठी प्रयत्न केले जातात. महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा बरोबरच आंतरमहाविद्यालयीन क्रिडा स्पर्धांसाठी विद्यार्थी तयार केले जातात. आंतरमहाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ क्रिडा स्पर्धांसाठी विद्यार्थी तयार व्हावे म्हणून रोज सायंकाळी विविध खेळांचा सराव करून घेण्यात येतो. या सत्रात विद्यापीठ क्रिडा स्पर्धेत ४ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

## ग्रंथालय विभाग :-

अध्ययन - अध्यापन प्रक्रियेतील एक महत्वाचा घटक असलेला ग्रंथालय हा शैक्षणिक संस्थेचा कणा मानला जातो. या जाणिवेतूनच अगदी सुरवाती पासून महाविद्यालयाचे ग्रंथालय अधिक संपन्न व समृध्द करण्याला प्राधान्य दिल्या गेले. नुकतेच ग्रंथालयाचे विस्तृतीकरण करून त्याला प्रशस्त वाचक कक्ष व इंटरनेट सुविधेनी परिपूर्ण करून संगणकांनी सुसज्ज नेटवर्क रिसोर्स सेंटर (**N R C**) सुरू करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील आमच्या विद्यार्थ्यांना **NRC** च्या माध्यमातून विनामुल्य इंटरनेट सेवा पुरविली जाते.

महाविद्यालयातील ग्रंथालयात विविध विषयावरील ग्रंथ संख्या १३६६७ आहे. **Inflibnet** सुविधेच्या माध्यमातून ग्रंथालयामध्ये ५,००,००० ई-बुक्स व २००० ई-जर्नल्स् उपलब्ध आहेत.

## Extracurricular & Extension Activities :-

विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानासोबतच विविध कला कौशल्य निर्माण व्हावे यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतीक समिती, राष्ट्रीय सेवा योजना पथक, लोकसंख्या शिक्षण मंडळ व महिला अध्ययन केंद्राच्या वतीने वेगवेगळी सांस्कृतिक व विस्तार उपक्रमे आयोजित केली जातात. सांस्कृतिक समितीच्या वतीने 'गुणवंतांचे अभिनंदन' हा सोहळा, ज्यामध्ये विद्यापीठ परिक्षेमध्ये महाविद्यालयातील गुणवंतांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिना' निमीत्याने नामवंत विचारवंतांना पाचारण करण्यात येते, तसेच 'स्व. प्रा.प्र.कृ. सुपले स्मृती व्याख्याना' साठी महाराष्ट्रातील प्रसिध्द वक्ते पाचारण केले जातात. विशेष म्हणजे हे उपक्रम दरवर्षी आयोजीत केले जातात. या उपक्रमांच्या माध्यमातून आजवर डॉ. द. भि. कुलकर्णी, श्री विवेक घळसासी, डॉ. रूपा कुलकर्णी, डॉ. पंकज चांदे, श्री अनिल देशमुख, डॉ. भाऊ लोखंडे, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. वेदप्रकाश मिश्रा, इत्यादी मान्यवरांचे मार्गदर्शन आमच्या विद्यार्थ्यांना लाभले आहे. या उपक्रमांसोबतच महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, नृत्य व गायन स्पर्धा इत्यादीचे आयोजन तसेच आंतरमहाविद्यालयीन व इतर बाह्य व्यासपीठावर आयोजीत सांस्कृतीक स्पर्धांसाठी विद्यार्थी तयार करण्याचे कार्य सांस्कृतिक समितीच्या वतीने करण्यात येते. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित तसेच समाजभिमुख होण्याकरीता तसेच त्यांच्यामध्ये नैतिक गुणधर्म वाढविण्याकरीता राष्ट्रीय सेवा योजना, लोकसंख्या शिक्षण मंडळ व महिला अध्ययन केंद्राच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात. त्यात प्रामुख्याने ग्रामीण भागातील निवासी शिबिराचे आयोजन करून श्रमदानातून गावकऱ्यांना उपयोगी असे कार्य करणे, तालुकास्तरीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन, रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन, कष्टकरी शेतकरी व ग्रामीण महिला यांच्या एकूण प्रगतीला हातभार लावण्यासाठी व्याख्यान, पथनाट्य यांचे आयोजन तसेच इतरही उपक्रम घेतले जातात.

## Student Support & Progression :-

विद्यार्थ्यांचे वर्तमान घवून त्यांचे भविष्यातील स्वप्न साकार करण्यासाठी हे महाविद्यालय सतत प्रयत्नशिल असते. विद्यार्थ्यांसाठी मोफत राबविले जाणारे **"Career Guidance & Placement Cell" and "Competitive Exam Guidance Centre"** हे त्याच प्रयत्नांचे भाग आहेत. ज्ञानार्जनातून भावी उद्दिष्टांकडे वाटचाल करीत असतांना विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाचे पाठबळ देण्याचे काम महाविद्यालयाचे असते. त्याच अनुषंगाने आमच्या महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन व गणतंत्र दिनाच्या निमित्याने केल्या जाणाऱ्या ध्वजारोहणाचा मान गुणवंत विद्यार्थ्यांना दिला जातो. विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयातून सर्वोच्च गुण प्राप्त विद्याला गणतंत्र दिनी ध्वजारोहणाचा बहुमान दिला जातो. विविध उपक्रम आयोजीत करताना विद्यार्थ्यांना संचालन व आयोजनाची जबाबदारी देऊन त्यांच्या अंगी आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्नही विशेष रूपाने केला जातो. याशिवाय विद्यार्थ्यांच्या तक्रार निवारण करण्यासाठी शासनाचा नियमाप्रमाणे **Internal Complaint Committee** आणि **Anti Ragging Cell** कार्यरत आहेत.

महाविद्यालयात 'माजी विद्यार्थी व पालक संघटना' कार्यरत असून त्याव्दारे विद्यार्थी शिक्षण पूर्णकेल्यानंतरही महाविद्यालयाच्या संपर्कात राहून त्यांच्या भावी प्रवासात ह्या महाविद्यालयाच्या सोबतीचे पाठबळ बाळगुण असतात. महाविद्यालय व माजी विद्यार्थी परस्परांच्या सहकार्यातन पुढील वाटचाल त्यामुळे निर्भयपणे व विश्वासाने करू शकतात. वर्ष २०२३ मध्ये महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेची रितसर नोंदणी करण्यात आली असून महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीसाठी ही संघटना आम्हाला उल्लेखनिय आधार देईल याबद्दल आम्हाला खात्री आहे. महाविद्यालयातील **'Career Guidance Centre'** विद्यार्थ्यांच्या भावी रोजगारासंबंधी माहिती व मार्गदर्शन पुरवीत असते.

## Internal Quality Assurance Cell :-

महाविद्यालयाच्या एकूण गुणात्मक विकासासाठी **Internal Quality Assurance Cell(QAC)** स्थापना करण्यात आली आहे. **IQAC** च्या माध्यमातून महाविद्यालयाने २०२३-२४ या सत्रात परत एकदा मुल्यांकन व मानांकनाच्या **Cycle 4** मध्ये महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावर **2.74 CGPA** मिळवून **'B+'** श्रेणी प्राप्त केली.

कार्यरत विद्याशाखांचा व उपलब्ध विषयांचा विस्तार यासाठी संस्थेचे योजनाबध्द प्रयत्न आहेत. आमच्या संपर्कात येणारे सारेच घटक कर्मचारी, विद्यार्थी, पालक शिक्षणाभिमुख व्हावेत हे आमचे ब्रिद आहे. कारण जनहित केवळ संस्थेचे नाव नाही तर तिच्या प्रवृत्तीचे निर्देशक आहे. समाज, शासन व विद्यापीठ या सर्व कसोट्यांवर आम्हाला आपले शैक्षणिक उपक्रम व प्रगती सिध्द करायची आहे.

डॉ. संजय सिंग
प्राचार्य

अभ्यासक्रम व विषय

## Faculty of Humanities

### बी.ए.

★ बी.ए. भाग १, २ व ३ ला नविन शैक्षणिक धोरणानुसार गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व्दारा जाहिर केलेला अभ्यासक्रम लागू राहील.

**महाविद्यालयातील उपलब्ध विषय :-**

१. मराठी   २. इंग्रजी   ३. अर्थशास्त्र   ४. इतिहास   ५. राज्यशास्त्र

६. समाजशास्त्र   ७. इंग्रजी साहित्य   8. मराठी साहित्य   ९. भूगोल   १०. गृहअर्थशास्त्र

- पर्यावरण शास्त्र हा विषय बी.ए. भाग १ च्या सेमिस्टर १ च्या विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे.
- लोकशाही निवडणूक व प्रशासन हा विषय बी.ए. भाग १ सेमीस्टर २ च्या विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे.

## COMMERCE & MANAGEMENT

### B. Com :- (Marathi & English Medium)

**महाविद्यालयातील उपलब्ध विषय :-**

1. English   2. Marathi   3. Financial Accounting
4. Statistical Technics & Business Mathematics   6. Business Economics
5. Principal of Management   7. Human Resource Development

- बी.कॉम. भाग १ व २ ला नविन शैक्षणिक धोरणानुसार गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व्दारा, जाहिर केलेला अभ्यासक्रम लागू राहील.
- पर्यावरण शास्त्र हा विषय बी.कॉम. भाग १ च्या सेमिस्टर १ च्या ना अनिवार्य आहे.
- लोकशाही निवडणूक व प्रशासन हा विषय बी.कॉम. भाग १ सेमिस्टर २ च्या विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे.

## B. Com II

**Sem. - III**

(1) English
(2) Marathi
(3) Corporate Accounting
(4) Monetary Economics
(5) Cost Accounting
(6) Company Law
(7) Organisational Behaviour - I (HRD)

**Sem. - IV**

(1) English
(2) Marathi
(3) Corporate Accounting
(4) Monetary Economics
(5) Cost Accounting
(6) Company Law
(7) Organisational Behaviour - II (HRD)

## B. Com III

**Sem. - V**

(1) Audit
(2) Commercial Law
(3) International Economics (Urban)
(4) Advance Accounting
(5) Business Communication - I
(6) Industrial Relation

**Sem. - VI**

(1) Income Tax
(2) Corporate Law
(3) Indian Economics (Rural)
(4) Advance Accounting
(5) Business Communication - II
(6) Labour Law

## ⋆ पदव्युत्तर विभाग ⋆

एम. ए. (मराठी), एम. ए. (समाजशास्त्र) व एम. कॉम.

टिप: नविन शैक्षणिक धोरणाला अनुसरून गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व्दारा जाहिर केलेला अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे.

## SHORT TERM COURSES

**The College intends to start the following short term courses in this academic session:**

1. Communicative English 2. Makeup Artist 3. Coaching classes for Competitive exams
4. Coaching Classes for Police Recruitment Exam

माहिती पुस्तिका
2026-27

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

# विद्यार्थी सुविधा केंद्र

## शां. पो. विधी महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर

महत्वाचे फोन नंबर
०७१३२-२२३१०४

कार्यालय वेळ : स. १०.०० ते सायं. ५.३० पर्यंत
मध्यान्न अवकाश दु. १.३० ते २.००
महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी केंद्र बंद राहील.

परिक्षा विभाग
०७१३२-२२३३२०, २२३३५०

| | प्रमाणपत्र | आवश्यक कागदपत्र |
|---|---|---|
| १) | मायग्रेशन | ऑनलाईन टि.सी. कोड, ओरिजीनल टि.सी.<br>झेरॉक्स शेवटच्या वर्षाची मार्कशिट |
| २) | इलिजिबीलीटी | १० ते सध्याचे सुरू असलेल्या शिक्षणाची मार्कशिट<br>टि.सी. (शेवटची), आधार कार् |
| ३) | प्रोव्हीजनल डिग्री | शेवटच्या २ सेमिस्टरची मार्कशिट (बी.ए. बी.कॉम. बी.एससी.)<br>५ व्या व ६ व्या सेमिस्टरची मार्कशीट (इंजिनिअरींग असल्यास)<br>७ व्या व ८ व्या सेमिस्टरची मार्कशीट) |
| ४) | मार्कशिट दुय्यम प्रत | रू. १०० च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र, मार्कशीट झेरॉक्स<br>(नसल्यास टि. आर. झेरॉक्स) ऑनलाईन पेमेंट केलेली पावतीर |
| ५) | मार्कशिटवरील नाव करेक्शन | ओरिजिनल मार्कशीट जमा करणे व झेरॉक्स प्रत वर कलेक्शन करून घेणे |
| ६) | मार्कशीट व्हेरिफिकेशन | ओरिजनल मार्कशीट झेरॉक्स (पुर्ण) |

| | प्रमाणपत्र | शुल्क |
|---|---|---|
| १) | मायग्रेशन | रू. २००/-<br>(बी.ई., बी.एड., बी.पी.एड.,बी. एफ. डी..<br>एम.एफ.डी. असल्यास रू. ५००/- |
| २) | इलिजिबीलीटी | रू. २२०/- |
| ३) | प्रोव्हीजनल डिग्री | रू. २२०/- |
| ४) | मार्कशीट मधील नावात दुरुस्ती | रू.१००/-(प्रति मार्कशिट) |
| ५) | डिग्रीमध्ये करेक्शन असल्यास | रू. १००/- |
| ६) | मार्कशिट दुय्यम प्रत | रू. ११०/- |
| ७) | मार्कशिट पडताळ (व्हेरिफीकेशन) | रू. २२०/- |
| ८) | मार्कशिट आणि डिग्री व्हेरिफीकेशन | रू. ४००/- |

**Bank Details for online payment :-** Bank of India, A/C No. 964021110000002, IFSC Code BKID0009648, A/c Name : Finance & Account Officer, Gondwana University, Gadchiroli

**Note:** 1) Cash deposit facility is not available at this facilitation center.
2) Direct deposit of cash in university account is prohibited. This type of payment will be sole responsi bility of depositor. This type of payment will not be processed/taken in to account at all and cash deposited amount will be for feited by the university.

विद्यापीठाच्या खात्यात रोखीने रक्कम जमा करणे प्रतिबंधित आहे. अशा प्रकारे जमा केलेल्या रक्कमेची संपूर्ण जबाबदारी ही रक्कम जमा करणाऱ्या संबंधिताची असेल. अशा प्रकारे रोखीने जमा केलेली रक्कम कोणत्याच कामाप्रित्यर्थ विचारात घेतली जाणार नाही व अशी रक्कम विद्यापीठाकडून जप्त करण्यात येईल..

महाराष्ट्र राज्य
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने
करिअर कट्टा
युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी

आय.ए.एस. आपल्या भेटीलाी

- राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/ महाराष्ट्र लोकसेवा आयोग
- पोलीस भरती
- बँकिंग सेवा
- स्टाफ सिलेक्शन कमिशन
- केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.)

ध्येयपुर्तीच्या
वाटेवर
सातत्याने
३६५ दिवस

उद्योजक आपल्या भेटीला

उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
वित्त व्यवस्थापन
निर्णय क्षमता
जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
आधुनिक तंत्रज्ञान

यासोबत सभासद शुल्क रू. ३६५/- भरल्यानंतर विद्यार्थ्यांना
०३ वर्ष प्रति वर्ष ०५ या पध्दतीने १५ कोर्स मोफत दिले जातील.

नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी
7507652555 या नंबरवर आपले नाव नोंदवा.

## शुल्क व निधी

**महाविद्यालयात प्रवेश घेतांना खालीलप्रमाणे शुल्क प्रत्येक विद्याला लागेल.**

| अ. क्र. | विवरण | विना अनुदानीत पदवी रूपये | अनुदानीत पदवी रूपये | विना अनुदानीत पदव्युत्तर रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | विद्यापीठ वार्षिक शुल्क | १६५.०० | १६५.०० | १६५.०० |
| २ | विद्यापीठ नामांकन शुल्क (प्रथम वर्षाकरीता) | २३१.०० | २३१.०० | २३१.०० |
| ३ | विद्यापीठ विद्यार्थी कल्याण निधी | ११.०० | ११.०० | ११.०० |
| ४ | खेळ व क्रिडा शुल्क | ३००.०० | १२०.०० | 300,00 |
| ५ | वैद्यकीय तपासणी शुल्क | ४४.00 | ४४.०० | ४४.00 |
| ६ | विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी | ११.०० | ११.०० | ११.०० |
| ७ | विद्यार्थी सहाय्य निधी | ११.०० | ११.00 | ११.०० |
| ८ | शारिरीक क्षमता चाचणी शुल्क | ४४.०० | ४४.०० | ४४.०० |
| ९ | अमानत राशी (कॉशन मनी) | २०.०० | २०.०० | २०.०० |
| १० | ओळखपत्र | ४६.०० | ४६.०० | ४६.०० |
| ११ | आगमन शुल्क (इतर विद्यापीठातून नागपूरविद्यापीठामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्याला) | २००.०० | १००.०० | २००.०० |
| १२ | प्रवेश नोंदणी शुल्क | १४३.०० | १४३.०० | १४३.०० |
| १३ | ऑनलाईन प्रवेश शुल्क | ११०.०० | ११०.०० | ११०.०० |
| १४ | शिक्षण शुल्क (संपूर्ण सत्रासाठी) | ८००.०० | ८००,०० | ८००.०० |
| १५ | अभ्यासेत्तर कार्यक्रम शुल्क | १५०.०० | ४०,०० | १५०.०० |
| १६ | ग्रंथालय शुल्क | २२०.०० | २२०.०० | २२०.०० |
| १७ | विद्यार्थी सुरक्षा विमा | ५५.०० | ५५.०० | ५५.०० |
| १८ | विद्यार्थी संघटना शुल्क | ५.०० | ५.०० | ५.०० |
| १९ | विद्यापीठ क्रिडा शुल्क | २५.०० | २५.०० | २५.०० |
| २० | प्रयोगशाळा शुल्क | १६५.०० | १६५.०० | १६५.०० |
| २१ | अश्वमेध शुल्क | ३०.०० | ३०.०० | 30.00 |
| २२ | राष्ट्रीय आपदा निधी | १०.०० | १०.०० | १०.०० |
| २३ | सराव परिक्षा निधी | ५०.०० | १०.०० | ५०,०० |
| २४ | डेव्हलपमेंट फी | ६००.०० | --- | २५.०० |
| २५ | मेंटेनन्स फी | ३२०.०० | --- | ४००.०० |
| २६ | ई-सुविधा शुल्क | १४०.०० | १४०.०० | १४०.०० |
| २७ | आपत्ती व्यवस्थापन विभाग शुल्क | १० | १०.०० | १० |
| २८ | पर्यावरण शुल्क (फक्त व्दितीय वर्षाकरीता E-Learing) | --- | १५०.०० | --- |
| २९ | वार्षिकांक शुल्क | १००.०० | १००.०० | १००.०० |
| ३० | रा. से. यो. स्वयंनिर्वाह एकक योजना शुल्क | २२.०० | २२.०० | २२०० |
| ३१ | विद्यापीठ सहाय्य निधी | ५.०० | ५.०० | ५.०० |

**सूचना :- जर शुल्का संदर्भात नविन पत्रक प्राप्त झाल्यास अद्यावत पत्रकाप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.**

टिप :-

१) प्रवेशावरील शुल्क व निधी यात बदल झाल्यास त्याची सूचना नंतर दिली जाईल व सुधारीत दराप्रमाणे शुल्क निधी आकारला जाईल.

२) याच महाविद्यालयात विद्याला पुनः प्रवेश देतांना वरील क्र. २, ९ समोरील शुल्क लागणार नाही.

३) S.C., S.T., N.T., O.B.C., S.B.C. संवर्गातील शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना वरील क्र. १ ते १०,१२ व १५ ते ३१ समोरील शुल्क लागणार नाही.

४) राजश्री छत्रपती शाहू महाराज सवलतीला पात्र विद्यार्थ्याला वरील क्र. १ ते ३१ समोरील पूर्ण शुल्कापैकी लागू रक्कम भरावी लागेल.

५) कोणतीही सवलत न घेता पूर्ण फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांना क्र. १ ते ३१ समोरील पूर्ण शुल्कापैकी लागू रक्कम भरावी लागेल.

६) राजश्री छत्रपती शाहू महाराज सवलत प्राप्त होणाऱ्या तसेच शिष्यवृत्ती मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क स्वतः जवळून देण्याची जरूरी नाही. कारण त्याची भरपाई सरकारकडून महाविद्यालया तर्फे करण्यात येईल, मात्र जे शुल्क सरकारकडून भरपाई होणार नाही. ते देण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील.

७) जर एखादा विद्यार्थ्याचे शुल्क कोणत्याही कारणाने नामंजूर झाले किंवा शिष्यवृत्ती अर्ज रद्द झाला तर त्याला /तिला पूर्ण शूल्क ताबडतोब भरावे लागेल.

८) मध्येच महाविद्यालय सोडल्यास त्या वर्षाचे पूर्ण शुल्क भरावे लागेल. एकदा प्रवेश घेतल्यानंतर वसूल केलेले शुल्क परत केले जाणार नाही आणि पूर्ण शुल्क दिल्याखेरीज विद्याला कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.

९) विद्यापीठ परिक्षा शुल्क विद्यापीठ परीक्षेचे आवेदन पत्र भरतांना विद्यापीठाने निर्धारीत केलेले परीक्षा शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यास कार्यालयात जमा करावे लागेल. हे शुल्क भरतांना महाविद्यालयाचे इतर कोणतेही शुल्क बाकी असल्यास ते देखील लागेल.

# प्रवेश पध्दती

बी.ए., बी.कॉम., एम.ए. प्रथम वर्षा मध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्जासोबत खालील कागदपत्र असणे आवश्यक आहे.

अ) १. वर्ग दहावीची गुणपत्रीका (छायांकित प्रत)
२. वर्ग दहावीची T.C. (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र) (छायांकित प्रत)
३. वर्ग बारावीची गुणपत्रीका (मुळ व छायांकित प्रत - दोन प्रती)
४. वर्ग बारावीची T.C. (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र) (छायांकित प्रत)
५. जातीचे प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (छायांकित प्रत)
६. पासपोर्ट आकाराचे फोटो (दोन)
७. आधारकार्डची छायांकित प्रत
८. मतदार कार्डची छायांकित प्रत
९. आधार लिंक्ड असलेला मोबाईल फोन
१०. अधिवास प्रमाणपत्र (छायांकीत प्रत)

ब) १. विद्यार्थ्याने पात्रता परीक्षा खाजगीरीत्या दिली असल्यास बोर्ड अथवा विद्यापीठाचे अस्थायी प्रमाणपत्र (प्रोव्हीजनल सर्टिफिकेट इन ओरीजनल) आणि तत्पूर्वीच्या परीक्षेची मुळ गुण पत्रिका व झेरॉक्स प्रत.

२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ अथवा गोंडवाना विद्यापीठ या व्यतिरीक्त इतर बोर्ड किंवा विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे मुळ निर्गमत प्रमाणपत्र (ओरीजनल मायग्रेशनसर्टिफिकेट) व त्यांची झेरॉक्स प्रत तसेच पात्रता प्रमाणपत्र व त्यांची छायांकित प्रत. (Eliक)क)gibility Certificate)

क) हे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या कार्यालयात दि. १६ ऑगष्ट पर्यंत पोहचणे आवश्यक असल्याने ते महाविद्यालयाच्या कार्यालयात प्रवेश घेतांनाच दाखल करण्यात यावे. मुदतीच्या आत प्रमाणपत्र दाखल न केल्यास विद्यापीठाकडून रु. १००/- विलंब शुल्क प्रतीदिवस आकारण्यात येते. हे प्रमाणपत्र कार्यालयात (त्याबाबतचे दंडासहीत) दाखल होईपर्यंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील प्रवेश अस्थायी (प्रोव्हीजनल) राहील. प्रवेश होईपर्यंत विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या पुरेशा सत्यप्रती आपल्या जवळ ठेवाव्यात. एकदा प्रमाणपत्र महाविद्यालयात दिल्यानंतर ते परत केले जाणार नाही.

१. S.C., S.T., N.T., O.B.C., S.B.C. च्या आधारे शिष्यवृत्ती व सवलती घ्यायच्या असल्यास जाती/जमातीचे अधिकृत, मुळ दाखले कार्यालयात दाखल करावे लागतील. S.T. संवर्गाकरीता जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक.

# महाविद्यालयात प्रवेश पात्रता

१) प्रत्येक विद्यार्थ्यांने प्रवेश घेतांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे आपली पात्रता आहे की नाही याची खात्री करून घ्यावी. कोणत्याही वर्गातील घेतलेल्या प्रवेशाची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

२) विद्यापीठ नियमानुसार विद्यार्थी प्रवेशास अपात्र ठरल्यास त्याचे शुल्क परत केले जाणार नाही.

३) प्रवेशाची अंतीम तारीख विद्यापीठ व शासन ठरविल तो राहील. परंतु वर्गातील जागा भरल्यास त्यापूर्वी प्रवेश बंद होऊ शकते.

४) प्रवेश देणे किंवा न देणे व प्रवेश दिल्यानंतर महाविद्यालयाचे नियम मोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव काढून टाकणे यासंबंधी संपूर्ण अधिकार प्राचार्यांना आहेत.

५) अभ्यासातील असमाधानकारक प्रगती, गैरवर्तन, संपात भाग घेणे किंवा प्रोत्साहन देणे, अनियमीत हजेरी इ. कारणांमुळे मिळालेली शिष्यवृत्ती बंद होऊ शकेल. लबाडीने मिळालेली शिष्यवृत्ती रद्द करण्यात येवून ती विद्यार्थ्यांकडून त्वरीत वसूल केल्या जाईल.

६) विद्यापीठाच्या परीक्षेला बसण्याकरीता प्रत्येक विषयावर झालेल्या व्याख्यानापैकी ७५% व्याख्यानास उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा त्याला परीक्षेला बसता येणार नाही.

७) विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांची वर्षातून वैद्यकीय तपासणी केली जाईल. ती तपासणी चुकवल्यास दंड केल्या जाईल. तसेच या तपासणीला अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे विद्यापीठाकडे योग्य कारवाईसाठी पाठविण्यात येतील.

८) योग्य परवानगी शिवाय सतत १५ दिवस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव हजेरी पटावरून काढण्यात येईल. त्याला पुनःप्रवेश फी रू. ११०/- द्यावी लागेल.

## * नामांकन प्रत (Enrolment Form) *

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला (बी.ए.१, बी.कॉम.१ व एम.ए.१) प्रथमच प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्याने कार्यालयातून नामांकण अर्ज घेऊन ते पूर्णपणे भरून कार्यालयात दि. ०१ ऑगस्ट पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. जे विद्यार्थी उपरोक्त तारखेनंतर नामांकन अर्ज भरतील त्यांच्याकडून विद्यापीठाचे सुचनेनुसार रु.१००/- विलंब शुल्क प्रतिदिवस आकारले जाईल. याबाबत विद्यापीठाव्दारे केले जाणारे बदल महाविद्यालयात लागू केले जातील याची नोंद घ्यावी.

## * <u>सवलती व शिष्यवृत्ती</u>

## योजनांची नावे :-

१) **स्व. वंदनाताई वारजुकर स्मृती शिष्यवृत्ती योजना** या योजने अंतर्गत बी.ए. व बी कॉम पदवी परीक्षेत सर्वोच्च CGPA प्राप्त विद्यार्थ्यास प्रत्येकी 5000 रुपये शिष्यवृत्ती देण्यात येईल.

२)भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना.

३) राज्य शासनाची मॅट्रिकोत्तर शिक्षण फी प्रतीपुर्ती योजना.

४) राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना (E.W.S.)

५) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

अ) ज्या विद्यार्थ्याच्या वडिलांचे व पालकांचे वार्षिक उत्पन्न (ओ.बी.सी. एन.टी. व एस.बी.सी. करीता १,००,०००/- रू., एस.सी. करीता २,००,०००/- रु. च्या आत, एस.टी. करीता २,५०,०००/- रु. च्या आत) असेल त्यांना सरकारतर्फे शिष्यवृत्ती दिली जाते. त्यांना शिक्षण शुल्क माफ असते. याशिवाय शुल्कात काही सवलती मिळतात.

ब) शेड्युल कास्ट, शेड्युल ट्राईब्स इतर मागासलेल्या जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्ग इत्यादी जातींना तसेच स्वातंत्र संग्राम सैनिकांची मुले आणि प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे पाल्य यांना शिष्यवृत्ती मिळते. याशिवाय राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्तीकरीता अर्ज करता येईल.

क) अपंग विद्यार्थ्यांना आपण कोणकोणत्या शिष्यवृत्तीला किंवा सवलतीला पात्र आहोत किंवा नाहीत याची कार्यालयीन चौकशी करून घ्यावी.

## • अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना :-

सन २००७-२००८ या शैक्षणिक वर्षापासून अल्पसंख्यांक (मुस्लीम, पारशी, शिख, खिश्चन व बौध्द) समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती सुरू केलेली असून शिष्यवृत्ती अर्ज सादर करतांना खालील कागदपत्रे

• विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन ॲप्लीकेशन पध्दतीने सादर करावयाचे आहे.

१) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, २) रू.१००/- चे स्टॅम्प पेपरवर पालकाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, ३) उत्पन्न मर्यादा रू. २,००,०००/- पर्यंत आहे. ४) निवासस्थानाचा पुरावा (ग्रामपंचायतचा दाखला), ५) अल्पसंख्यांक समाजाचे असल्याचे ॲफेडेव्हीड रू. १००/- चे स्टॅम्पपेपरवर, ६) साक्षांकित केलेली गुणपत्रिका, ७) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व गुणपत्रिका, ८) मागील परिक्षेत ५०% पेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे. ९) बँक पासबूक ची झेरॉक्स प्रत, १०) वय अधिवास प्रमाणपत्र.

## • अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना :-

## राजश्री शाहू महाराज शिक्षण शिष्यवृत्ती :-

ज्या विद्यार्थ्यांकडे जात प्रमाणपत्र नसेल अशा विद्यार्थ्यांना राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती चा लाभ घेता येईल व त्यासाठी खालील कागदपत्रे लागतील.

१) तहसिलदाराकडून प्रमाणित उत्पन्नाचा दाखला (रू. १,००,०००/-पर्यंत), २) रहिवासी दाखला, ३) वय अधिवास प्रमाणपत्र, ४) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व गुणपत्रिका

## स्व.डॉ. वासुदेवराव भांडारकर शिष्यवृत्ती योजना :-

सहिष्णू फाऊंडेशन यांचेव्दारे प्रायोजीत स्व.डॉ. वासुदेवराव भांडारकर शिष्यवृत्ती योजना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सत्र २०१२-२२ पासून सुरू करण्यात आली आहे. या शिष्यवृत्ती योजने अंतर्गत तीन विभागांमध्ये शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे.

* गुणवंत विद्यार्थी/विद्यार्थीनी दिव्यांग अथवा अनाथ विद्यार्थी
* महाराष्ट्र शासनाच्या अंत्योदय योजनेअंतर्गत समाविष्ट परिवारातील विद्यार्थी

या शिष्यवृत्ती योजने संदर्भात अधिक माहिती महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर (**Website : http://www.gwcollegenagbhid.ac.in**) उपलब्ध आहे.

* सवलती व शिष्यवृत्ती मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष सुचना

सरकारी नियमाप्रमाणे जेवढ्या सुट्ट्या मंजूर होतात त्यापेक्षा जास्त दिवस बिना परवानगी गैरहजर राहिल्यास त्याची शिष्यवृत्ती कापली जाते. तसेच महाविद्यालयीन परिक्षांची प्रगती असमाधानकारक असल्यास विद्यार्थ्यांची राजश्री शाहू महाराजची सवलत किंवा शिष्यवृत्ती नामंजूर होऊ शकते.

अ) शिष्यवृत्ती अर्ज भरतांना पुढील काळजी विद्यार्थ्यांना घेणे आवश्यक आहे. :-

१. अ) वस्तीगृहाच्या शिष्यवृत्तीकरीता अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी वस्तीगृहाचे प्रमाणपत्र जोडतांना ते वस्तीगृह, जिल्हा समाज कल्याण अधिकारी चंद्रपूर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि महाविद्यालयाकडून मान्यता प्राप्त (**approved**) आहे, याची शहानिशा करून घ्यावी. अन्यथा जोडलेले प्रमाणपत्र महाविद्यालय स्विकारणार नाही.

ब) वरील अटींची पुर्तता न झाल्यास त्या विद्यार्थ्यांचा अर्ज (Day Scholar) म्हणून स्विकारून समाजकल्याण अधिकाऱ्याकडे पाठविल्या जाईल.

२. नविन नियमानुसार शिष्यवृत्ती अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाचे असल्यामुळे राष्ट्रीयकृत बँकेत खाते काढणे आवश्यक आहे. कारण शिष्यवृत्ती रक्कम यापुढे विद्यार्थ्यांच्या खात्यावरच परस्पर बँकेत जमा करण्यात येईल.

३. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन करून आवश्यक प्रमाणपत्रासोबत प्रवेश घेतलेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत कार्यालयात पोहचणे आवश्यक आहे. त्या संबंधीची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

४. ज्या मागासवर्गीय (एस.सी., ओबीसी., एन.टी व एसबीसी.) विद्यार्थ्यांच्या पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न २,००,०००/-रू. व एस.टी. विद्यार्थ्यांकरीता २,५०,०००/-च्यावर आहे, त्या विद्यार्थ्यांनी G.O.I. Scholarship चे फार्म न भरता Declaration of income and caste चे फॉर्म भरावे.

५. मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी भारत सरकारच्या शिष्यवृत्ती अर्जासोबत गुण पत्रिकेची सत्यप्रत, शाळा सोडल्यास (H.S.C.) प्रमाणपत्राची सत्यप्रत (कार्यकारी दंडाधिकारी यांचे) जातीचे प्रमाणपत्र, बँकेच्या पासबुकची सत्यप्रत, उत्पन्नाचा दाखला, दहावीची गुणपत्रिका तसेच ज्यांचे पालक नोकरीत असतील त्यांनी मागील वर्षाचे मुळ पगार, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वाढीव मुळ पगार वइतर भत्ता मिळत असल्यास पुर्ण तपशिलासह प्रमाणपत्र जोडावे. आवश्यक त्या ठिकाणी फॉर्मवर विद्यार्थी व पालकांची सही असणे आवश्यक आहे.

६. दुसऱ्या जिल्ह्यातून योणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म सोबत जिल्हा बदलविण्याचे प्रमाणपत्र जोडावे, ते प्रमाणपत्र संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या सही शिक्यानिशी असावे.

७. शिक्षण घेत असतांना ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडला असेल. (उदा.नापास होणे, आजारपणामुळे इ.) त्या विद्यार्थ्यांनी २० रू. च्या कोर्ट फी स्टॅंपसह ॲफिडेव्हीट करून शिष्यवृत्ती फॉर्मला जोडावे.

८. एस.सी. कॅटीगीरीच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची शिष्यवृत्ती रक्कमेपैकी ६० टक्के रक्कम महाविद्यालयात जमा करावी लागेल.

ब) राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती चे अर्ज भरतांना घ्यावयाची काळजी

१. फी माफीचा अर्ज व उत्पन्न दाखला रु. १,००,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांकडून फी माफीचा अर्ज सूचना निघाल्याच्या तारेखेपासून १५ दिवसांचे आत ऑनलाईन जमा करून कार्यालयात देणे आवश्यक आहे.

२. १,००,०००/-रू. चे आत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या नविन विद्यार्थ्यांकरीता Fresh Form व जुन्या विद्यार्थ्यांकरीता Contiuation Form भरावयाचे आहे. मात्र सरकारी किंवा खाजगी (State Govt. Local Bodies Servants) ठिकाणी नोकरी करत असलेल्या कर्मचाऱ्याच्या पाल्यांनी ते ज्या विभागात नोकरी करीत आहे. तेथून मुळ पगाराचे प्रमाणपत्र (Basic Pay in come Certificate) तेथील अधिकाऱ्यांचे सही शिक्क्यानिशी देणे जरूरीचे आहे तसेच १६ नं. फार्म आवश्यक आहे.

## ओळखपत्र (Identity Card)

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे ओळखपत्र महाविद्यालयाच्या परिसरात वावरतांना विद्यार्थ्यांजवळ असले पाहिजे. ओळखपत्रातील माहिती व अनाधीकृत बदल करण्याच विद्याने प्रयत्न केला तर गंभीर गुन्हा ठरतो व कडक शिक्षा होऊ शकते.

## विद्यार्थ्यांना महत्वाच्या सुचना

१. राष्ट्रीय सेवा योजना, प्रौढ शिक्षण, खेळ, सांस्कृतिक इत्यादी उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे गुण दिले जातील.

२. विद्यार्थ्यांनी १५ ऑगस्ट, २६ जानेवारी तसेच महाविद्यालयात होणाऱ्या कार्यक्रमात उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

३. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या निवडणूका विद्यापीठाच्या नियमानुसार होतील.

४. महाविद्यालयाची मालमत्ता विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वापरावी. हेतुपुरस्पर मालमत्तेची हानी करणे गुन्हा ठरेल. हानी झालेल्या मालमत्तेची भरपाई गुन्हा केलेल्या विद्यार्थ्यांकडून केली जाईल.

५. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करावे. त्यांनी महाविद्यालयाचे अधिकारी प्राध्यापक वर्ग आणि महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग यांच्याशी आदरपूर्वक व सभ्यतेची वागणूक ठेवावी. कोणतीही असभ्य गैरवर्तणुक घडल्यास महाविद्यालयातून काढून टाकले जाईल. संबंधीत विद्यापीठ अध्यादेशाप्रमाणे याबाबतचे सर्व अधिकार प्राचार्यांकडे आहेत.

६. महत्वाच्या सुचना वर्गात वाचल्या जातील. इतर सर्व सुचना फलकावर लावण्यात येतील. विद्यार्थ्यांनी दरोज सुचना फलक पाहून सुचनांची माहिती करून घ्यावी. सुचना वर्गात न आल्याची सबब ऐकली जाणार नाही

.

७. प्राचार्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय महाविद्यालयाच्या परिसरात सभा, संम्मेलने, किंवा इतर कार्यक्रम घेता येणार नाही.

८. वार्षिक परीक्षा सुरू होण्यापुर्वी १५ दिवस आधी प्रत्येक विद्याने महाविद्यालयाची पुस्तके, फी, दंड, याची बाकी देऊन **Clearence Certificate** घेतले पाहिजे, त्याशिवाय परीक्षेचे प्रवेशपत्र मिळणार नाही.

९. विद्याने प्राचार्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय महाविद्यालयासंबंधी कोणतीही माहिती प्रकाशनार्थ वर्तमानपत्रात देऊ नये, अन्यथः यासंबंधी कडक कारवाई करण्यात येईल.

१०. अभ्यासात प्रगती मुळीच नसणे, सतत गैरहजेरी, गैरवर्तन, कॉलेजची फी न देणे किंवा खोटे प्रमाणपत्र देऊन प्रवेश मिळविणे इत्यादी कारणाने महाविद्यालयातून विद्याला काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.

११. विद्याला (Bonafide Certificate) हवे असल्यास रू.१०/- शुल्क भरावे लागेल.

१२. विद्याचे ओळखपत्र हरविले असल्यास ओळखपत्राची दुय्यम प्रत (Duplicate) रु. ५०/- आणि रु. २०/- दंड भरावा लागेल.

१३. डुप्लीकेट ट्रान्सफर सर्टिफिकेट (T.C.) हवी असल्यास २००/- रू. नगदी व सोबत ॲफिडेव्हीट असल्यास देण्यात येईल.

१४. महाविद्यालयात होणाऱ्या सर्व कार्यक्रमांना विद्यार्थी, विद्यार्थीनींनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. जे विद्यार्थी अनुपस्थित राहतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल.

१५. महाविद्यालयात तंबाखू, पान, गुटका खाऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांवर योग्य कारवाई करण्यात येईल.

१६. महाराष्ट्र राज्य अधिनियम क्र. ३३, दि. १५ मे १९९९ नुसार रॅगिंग घेणाऱ्या विद्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

गोविंदराव वारजुकर कला - वाणिज्य महाविद्यालय
नागभीड - ४४१२०५, जिल्हा चंद्रपूर (म.रा.)
..प्राध्यापक वृंद..

## कला विभाग

**इंग्रजी विभाग :-**

| | | |
|---|---|---|
| १. प्राचार्य डॉ. संजय सिंग | | एम.ए., पीएच.डी., एस्सी. (भौतिकशास्त्र) |
| २. प्रा. डॉ. दिपक मोरांडे | ७७७४९३२७३२ | एम.ए., एम.फील., पीएच. डी. |
| ३. प्रा. डॉ. कु. निकीता मिश्रा | ९९७०४०६१८३ | एम.ए., पीएच. डी. |
| ४. प्रा. तौफिक पठाण | | एम.ए., एम.फील., नेट, सेट |
| ५. प्रा. अश्विनी बोरकुटे | | एम.ए., एम.फील., बि.एड., सेट |

**मराठी विभाग :-**

| | | |
|---|---|---|
| ६. प्रा.डॉ. अनमोल शेंडे | ९४०४१२०४०९ | एम.ए.,नेट (मराठी) एम.ए. (राज्य), पीएच.डी. |
| ७. प्रा. एम. डब्ल्यू. सोनटक्के | | एम.ए., बि.एड., नेट (मराठी) |
| ८. प्रा. डॉ. जी. एस. सांगोळकर | | एम.ए., नेट, मराठी पीएच. डी. |

**अर्थशास्त्र विभाग :-**

| | |
|---|---|
| ९. प्रा. डॉ. एम. पी. कापगते | एम.ए., नेट, सेट, पीएच. डी. (अर्थशास्त्र) |
| १०. प्रा. जी. एम. दोनाडकर | एम.ए., सेट (अर्थशास्त्र). |

**इतिहास विभाग :-**

| | |
|---|---|
| ११. प्रा. बी. एच. लोणारे | एम.ए., नेट (इतिहास) |
| १२. प्रा. एम. आर. श्रीरामे | एम.ए., नेट (इतिहास). |

**समाजशास्त्र विभाग :-**

| | |
|---|---|
| १३. प्रा. डॉ. एस. एस. मंढरे | एम.ए., सेट (समाजशास्त्र) |
| १४. प्रा. एस. के. गेडाम | एम.ए., एम.फील., सेट (समाजशास्त्र) |

**राज्यशास्त्र विभाग :-**

| | |
|---|---|
| १५. प्रा. एम. टी. देवढगले | एम.ए., सेट (राज्यशास्त्र) |
| १६. प्रा. आकांत मांदाडे | एम.ए., सेट (राज्यशास्त्र) |

**शारीरिक शिक्षण विभाग :-**

१७. प्रा. डॉ.सी. एन. हनवंते (प्रभारी कार्यभार)

**भुगोल विभाग :-**

| | | |
|---|---|---|
| १८. प्रा. डॉ. रविंद्र रणदिवे | ९४२३६२०११२ | एम.ए., बी.एड., पीएच. डी. |

**गृहअर्थशास्त्र विभाग :-**

| | | |
|---|---|---|
| १९. प्रा. डॉ. सौ. विशाखा कायंदे | ९४२२९४८१२४ | एम.ए., पीएच. डी. |

**वाणिज्य विभाग :-**

| | | |
|---|---|---|
| २०. प्रा. डॉ. विजय बनकर | ८४२२८२५१५८ | एम.कॉम., एम.फील., पीएच. डी. |
| २१. प्रा. डॉ. पी. एस. मेश्राम | | एम.कॉम., सेट, पीएच.डी. |
| २२. प्रा. जे. ए. सोनकुसरे | | एम.कॉम., सेट |

**ग्रंथालय विभाग :-**

| | | |
|---|---|---|
| २३. प्रा. डॉ. चंद्रशेखर हनवंते | ९४२२९९९९३९ | एम.कॉम., एम.लिब, एम.फील., पीएच.डी. |

**शिक्षकेतर कर्मचारी**

| | | |
|---|---|---|
| २४. श्री. वामन निहिटे | ९४०४१२१३८० | वरिष्ठ लिपिक |
| २५. श्रीमती पुजा कोर | ९७६४२९६७०३ | कनिष्ठ लिपिक |

**चतुर्थश्रेणी कर्मचारी**

| | |
|---|---|
| २६. श्री. सुनिल गराडे | ९४२३६७६६२४ |

**जनहित शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी व्दारा संचालित**
**गोविंदराव वारजुकर महाविद्यालय, नागभीड**
**क्षणिक श्रेष्ठता पुरस्कार - २०२५**

**वर्ग :- बि.कॉम. भाग ३**

| अ.क्र | विषय | प्रायोजकाचे नाव | स्मृती प्रित्यर्थ | पारितोषिकाचे नाव | पुरस्कार प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १. | अंकेक्षण व आयकर | अनामिका | - - - | मानव पुरस्कार | चेतन नरेश गोंगल |
| २. | वाणिज्य व नियमित कायदे | कायदेश्री रामकृष्ण पैकाजी निगम | कै. दत्ता रामकृष्ण निगम | चाणक्य पुरस्कार | नेहा रमेश बोरकर |
| ३. | भारतीय व आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र | कायदेश्री रामकृष्ण पैकाजी निगम | कै. दत्ता रामकृष्ण निगम | वसुधा पुरस्कार | निखिल सुखदेव वाकुडकर |
| ४. | उच्चस्तरिय लेखांक | निगमरी पंजाबराव गावंडे | कै. नत्थूजी गावंडे | सर्वोदय पुरस्कार | साक्षी हरिदास बावनकर |
| ५. | व्यावसायीक संदेशवहन | सौ. उज्वला वासुदेव सालवटकर | गं. भा. बैनाताई सालवटकर | औदुंबर पुरस्कार | नेहा रमेश बोरकर |
| ६. | औद्योगिक संबंध व श्रमकायदे | श्री. अजय वामनराव पाकमोडे | स्व. कृष्णाजी सिताराम पाकमोडे | इंद्रधनुष्य पुरस्कार | चेतन नरेश गोंगल |

**वर्ग:- बि.ए. भाग ३**

| अ.क्र | विषय | प्रायोजकाचे नाव | स्मृती प्रित्यर्थ | पारितोषिकाचे नाव | पुरस्कार प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १. | इंग्रजी आवश्यक | डॉ.आरती कुलकर्णी | कै. बापुराव नारायण कुसरे | कै रमेश विठ्ठलराव बनपुरकर | मीतू जनार्दन रेफाडे |
| २. | इंग्रजी साहित्य | श्री जयंतीभाई जसभाई पटेल | कै. जसभाई मोतीभाई पटेल | डॉ. सलमान रश्दी | रुचिता आसाराम चौधरी |
| ३. | मराठी आवश्यक | डॉ. मदन कुलकर्णी | कै.पांडुरंगजी कुलकर्णी | नारायण सुर्वे | अंजली मुक्तेश्वर करकाडे |
| ४. | मराठी साहित्य | श्री सारंग रमेश बनपुरकर | कै. रमेश विठ्ठलराव बनपुरकर | डॉ. ग.त्र्य. देशपांडे | अंजली मुक्तेश्वर करकाडे |

## महाविद्यालयीन पुरस्कार

| अ.क्र | प्रायोजकाचे नाव | स्मृती प्रित्यर्थ | पारितोषिकाचे नाव | पुरस्कार प्राप्त विद्यार्थी | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | महाविद्यालया तर्फे | --- | जनहित पुरस्कार २०२५ | नेहा रमेश बोरकर | बि.कॉम. भाग ३ |
| २. | महाविद्यालया तर्फे | --- | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार २०२५ | नैना शंकर चौकें | बि.कॉम. भाग ३ |
| ३. | श्री अभिषेक राजन जयस्वाल | स्व. चंद्रभागाबाई जयस्वाल मन्त्रालाल | सावित्रीबाई फुले पुरस्कार २०२५ | नेहा रमेश बोरकर | बि.कॉम. भाग ३ |
| ४. | वाणिज्य शाखा श्री अशोक संगतसाहेब | स्व. अरूण चतुरदासजी संगतसाहेब | वाणिज्य शाखा पुरस्कार २०२५ | नेहा रमेश बोरकर | बि.कॉम. भाग ३ |
| ५. | स्वप्नील पांडुरंगजी चौधरी | कै. माधुरी पांडुरंगजी चौधरी | कला शाखा पुरस्कार २०२५ | अंजली मुक्तेश्वर करकाडे | बि.ए. भाग ३. |
| ६. | अर्थशास्त्र विभाग प्रा. विनायक सोनटक्के | स्व. नथ्थुजी सोनटक्के | अर्थशास्त्र विभाग पुरस्कार २०२५ | | बि.ए. भाग ३. |
| ७. | नॉलेज कमांडोज क्लब | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम | Best LibraryUser Award Award 2025 | | बि..ए. भाग २ |

| अ.क्र | विषय | प्रायोजकाचे नाव | स्मृती प्रित्यर्थ | पारितोषिकाचे नाव | पुरस्कार प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| ५. | भूगोल | श्री विश्वेश्वर हरिदास गिरीपुंजे | | भास्कराचार्य | भुमेश्वरी शंकर भोयर |
| ६. | गृहअर्थशास्त्र | श्री आशिष देविदासजी जगनाडे | कै. अनुसया शेषरावजी जगनाडे | संपदा पुरस्कार | अंजली मुक्तेश्वर करकाडे |
| ७. | इतिहास | श्री बाबासाहेब येसनसुरे | कै.राधिकाबाई येसनसुरे | स्वातंत्र्यवीर पुरस्कार | विनय दिवाकर देशमुख |
| ८. | समाजशास्त्र | श्री. शशिकांत बबनराव मोहिते | कै. बबनराव तुकारामजी मोहिते | डॉ. जी.एस. धुर्वे | अंजली मुक्तेश्वर करकाडे |
| ९. | अर्थशास्त्र | श्री भरत नथ्थुजी कामडी | कै. नत्थुजी सोनबाजी कामडी | डॉ. अमर्त्य सेन | उपलब्ध नाही |
| १०. | राज्यशास्त्र | श्री वसंत रासेकर | स्व. वनिता रासेकर | डॉ. भा.ल. भोळे | भुमेश्वरी शंकर भोयर |

**वर्ग :- एम. ए. मराठी**

| अ.क्र | विषय | प्रायोजकाचे नाव | स्मृती प्रित्यर्थ | पारितोषिकाचे नाव | पुरस्कार प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १. | मराठी | सौ. अरुणा डी. जगनाडे | कै. अभिजीत जगनाडे | पु.ल. देशपांडे पुरस्कार २०२४ | अविनाश मनोहर वाघमारे |

**वर्ग :- एम. ए. मराठी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | समाजशास्त्र पुरस्कार | मा. प्राचार्य डी. एस. जगनाडे | कै.. शेषराव लक्ष्मणराव जगनाडे | महात्मा ज्योतीबा फुले २०२४ | ओमकारेश्वर तीर्थराज मेश्राम |

**GOVINDRAO WARJUKAR ARTS & COMERCE COLLEGE, NAGBHID**
**COLLEGE ANNUAL CALENDAR (2026-27)**

| S.N. | Activity | Period |
|---|---|---|
| 1. | Admission & Entolment | Immediately after declaration of HSSC exam Results |
| 2. | Commencement of First Term (Odd Semesters) | 16 th June, 2026 |
| 3. | Enrolment for NSS Unit | As per University Notification |
| 4. | Fresher's Day | 09 August, 2026 |
| 5. | Independence Day Function | 15 August, 2026 |
| 6. | Meritotious Students Felicitation Function | 05 September, 2026 |
| 7. | Blood Donation and Blood Grouping Camp to mark NSS Day | 24 September, 2026 |
| 8. | Late Prof. Suple Memorial Lecture | 1 October, 2026 |
| 9. | Mahatma Gandhi Jayanti Celebration | 2 October, 2026 |
| 10. | Late Govindrao Warjukar Death Anniversary | 17 October, 2026 |
| 11. | Internal Evaluation (First Term) | Second week of August, September & October |
| 12. | University Semester End Examinations (Odd Sem) | 27 October, 2026 Onwards |
| 13. | Diwali/Winter Vacation | 1 November to 30 November 2026 |
| 14. | Commencementof Second Term (Even Semesters) | 2 December, 2026 |
| 15. | Special Camp of NSS | 07 December to 13 December 2026 |
| 16. | Dr. Ambedkar Memorial Lecture to mark the Mahaparinirwan Din | 6 December, 2026 |
| 17. | Annual Cultural & Sports Festival | 15 December to 18 December 2026 |
| 18. | World Geography Day Function | 14 January 2027 |
| 19. | Republic Day Function | 26 January 2027 |
| 20. | Alumni/Parent Meet | Last week of January 2027 |
| 21. | Excursion/Study Tour | Second Weekof February 2027 |
| 22. | Farewell Function | Last Week of March |
| 23. | Internal Evalution (Second Term) | Second week of January, February & March 2027 |
| 24. | University Semester End Examinations (Even Sem) | 6 April, 2027 |

Second and fourth Saturday of evey month (coming within the period of First and Second Term) shall be reserved for Subject Club activities.

## पालकास सुचना

आपल्या पाल्याच्या सर्वांगीण प्रगतीकरीता आम्ही नेहमीच प्रयत्नशील असतो. पुष्कळदा आपल्या पाल्याची अनियमीत हजेरी, अभ्यासातील कमजोरी, महाविद्यालयीन परिक्षेला न बसणे किंवा परिक्षेत अपयश इत्यादी बाबतीत पालकांना माहिती नसते. त्यासाठी अधून मधन महाविद्यालयात येऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीची माहिती घ्यावी. महाविद्यालयात पालक संघ कार्यरत असून, या संघाच्या बैठकीत उपस्थित राहून आपण आपल्या पाल्याच्या प्रगतीबाबत माहिती घेऊ शकता. विद्यार्थ्यांच्या एकूण प्रगतीसाठी महाविद्यालय करीत असलेल्या प्रयत्नांना अधिक परिणामकारक करण्याकरीता आपल्या विधायक सुचनांचे नेहमीच स्वागत आहे.

डॉ. संजय सिंग
प्राचार्य

## विद्यार्थ्यांना महत्वाच्या सुचना

महाविद्यालयाचे नियमीत वर्ग दि. १६/०६/२०२६ पासून सुरू होतील. तरी विद्यार्थ्यांनी वर्गाला उपस्थित राहावे. निकाल लागल्यानंतर नियमानुसार प्रवेश दिला जाईल. अभ्यासक्रम वेळापत्रकानुसार शिकवून पुर्ण केल्या जाईल.

ज्या वर्गाचे निकाल १६/०६/२०२६ पर्यंत लागलेले नाहीत. त्या वर्गाचे विद्यार्थी (महाविद्यालयातीलनियमीत विद्यार्थी) वरच्या वर्गाच्यातासिकेला उपस्थित राहू शकतील

शासनाच्या व विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांची कमीतकमी ७५ टक्के उपस्थिती आवश्यकआहे. ७५ टक्कयापेक्षा कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

## रॅगिंग

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रॅगिंग व लैंगिक अत्याचार हा दंडात्मक गुन्हा असून प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी यापुर्वी रॅगिंग किंवा लैंगिक अत्याचार प्रकरणामध्ये गुंतलेला असेल तर त्याला महाविद्यालयात प्रवेश नाकारण्यात येईल किंवा प्रवेश दिल्यानंतरही असे निर्देशनास आले की, सदर विद्यार्थी रॅगिंग किंवा लैंगिक अत्याचार प्रकरणामध्ये गुंतलेला होता किंवा आहे, तर त्यावर शासकिय नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

GOVNDWANA UNIVERSITY, GADCHIROLI
ACADEMIC CALENDAR 2026-27

Minimum instruction days per semester are:

| | |
|---|---|
| Semester I | 90 days and for professional courses as mentioned by Central admission procrss. |
| Semester II | 90 days. |
| Total | 180 days. |

A) ACADEMIC CALENDAR FOR THE COURSES CONDUCTED AS PER "SEMESTER" PATTERN FOR SESSION 2026-27

1. Terms & Vacation :-

| | | |
|---|---|---|
| First Term (Odd semesters) | : | 16/06/2026 to 31/10/2026 |
| Diwali Holidays/Winter Vacation | : | 01/11/2026 to 30/11/2026 |
| Second Term (Even semesters) | : | 02/12/2026 to 30/04/2027 |
| Summer Vacation | : | 01/05/2027 to 15/06/2027 |
| Summer Vacation | : | 16/05/2027 to 15/06/2027 |

2. Admissions:-

| | | |
|---|---|---|
| a) Last date of admission (First term odd sem) | : | 08/08/2026 |
| b) Last date for Admission with prior permission of the Vice-Chancellor | : | 05/09/2026 |

3. Last date of submission of Enrollment forms to the university :

I) Upto 14/08/2026 for admitted students upto 08/08/2026

ii) Upto 15/09/2026 for the Student admitted between 09/08/2026 to 05/09/2026

iii) For centralized admission last date of enrollment shall be 10 days from the date admission as notified by competent authority.

4. Examination :-

| | | |
|---|---|---|
| a) Winter semester Examination. Commencement of Examination | : | 27/10/2026 |
| Last date for receipt of examinations Forms | | |
| a) Regular Students | : | 01/10/2026 |
| b) Old Ex-students/External student | : | 01/10/2026 |
| c) Ex-student of immediately previous examination | : | 01/10/2026 |

5. Examination

| | | |
|---|---|---|
| a) Summer Semester Examinations. Commencement of Examination | | 06/04/2027 |
| Last date for receipt of Examinations forms | | |
| a) Regular Students | : | 15/03/2027 |
| b) Old Ex-students/External students | : | 15/03/2027 |
| c) Ex-students of immediately previous Examination | : | 15/03/2027 |

6. Declaration of Result As per provision of Maharashtra Public Universities Act, 2016

B) ACADEMIC CALENDER FOR THE COURSES CONDUCTED AS PER "ANNUAL" PATTERN FOR SESSION 2026-2027

1. Terms & Vacation

| | | | |
|---|---|---|---|
| First Term | : 16/06/2026 | to | 31/10/2026 |
| Diwali Holidays/Winter Vacation | : 02/11/2026 | to | 01/12/2026 |
| Second Term | : 02/12/2026 | to | 30/04/2027 |
| Summer Vacation for affiliated colleges | : 01/05/2027 | to | 15/06/2027 |
| Summer Vacation (PGTD University) | : 16/05/2027 | to | 15/06/2027 |

2. Adminissions

a) Last date of admission : 08/08/2026

b) Last date for Admission with prior permission ofthe Vice-Chancellor : 05/09/2026

3. Last date of Submission of Enrollment forms to the University

: I) upto 14/08/2026 for admitted student upto 08/08/2026

: ii) upto 15/09/2026 for the Student admitted between 09/08/2026 to 05/09/2026

iii) For centralized admission last date of enrollment shall be 10 days from the date admission as notified by the competent authority.

4. Examination:-

1) Winter semester Examinations

Commencement of Examination : 02/11/2026

2) Last date for receipt of examinations Forms:-

a) RegularStudents : 01/10/2026

b) Old Ex-students/External students : 01/10/2026

c) Ex-students ofimmediately previous Examination : 01/10/2026

5. Examination:-

1) Summer Examinations

Commencement of Examination : 12/04/2027

2) Last date for receipt of examinations Forms:-

a) RegularStudents : 15/03/2027

b) Old Ex-students/External students : 15/03/2027

c) Ex-students ofimmediately previous Examination : 15/03/2027

Ph. D

| Sr. No. | Examination | Date |
|---|---|---|
| 1 | Ph. D. Course Work | Shall be notified Separately |

SPECIAL ACADEMIC EVENTS

| | |
|---|---|
| University Foundation | 2 nd October |
| Convocation of university | As per prior Approval of Hon'ble Chancellor |

Note :-

1) In-lieu of the curtailmentof vacation by 2 weeks, the University teachers may be credited with 1/3rd of the period oftheir earned leaves.

2) The Academic Year 2026-27 will be over on 30/04/2027 for affiliated colleges and on 15/05/2027 for Post Graduate Teaching Department of Gondwana university, Gadchiroli.

3) Commencement of NextAcademic session for this batch 16/06/2027 for affiliated colleges as well as post Graduate Teaching Departmentof Gondwana university, Gadchiroli.

# गोंडवाना विद्यापीठ गीत

गोंडवाना नव तपोवन आदिजन वन परिसरी
विश्वविद्यापीठ हे ज्ञानार्चना या मंदिरी ॥ धृ ॥

स्त्रोत आदिम संस्कृतीचा या प्रदेशी निर्मळ
शास्त्र, विद्या अन् कलेतून अमृताचे ओहळ
त्या झऱ्यांना करूनी विकसित मिळवू विद्यासागरी ॥ १ ॥

शास्त्र, वाङ्मय, तंत्रविद्या व्यावसायिक ज्ञानही
अर्थ वा वाणिज्य क्रिडा अन् कला विज्ञानही
नित इथे बहरेल प्रतिभा नवयुवांच्या अंतरी ॥ २ ॥

ज्ञानगंगा पुण्यापावन जीव तिजसंगे शिव
उचित संस्कारेच जगती श्रेष्ठ ठरतो मानव
उंच, उन्नतझेप घेतील छात्र इथले अंबरी ॥ ३ ॥

दलित,पिंडीत, दीन, शोषित सर्व जाती बांधव
ज्ञानपीठी या निमंत्रित शिक्षणोत्सुक मानव
प्राप्तविद्येनेच मनुजा अभ्युदय या भूवरी ॥ ४ ॥

बंधुता, स्वातंत्र्य, समता, न्यायनीतीला जपावे
विश्वशांतीस्तव नवे आव्हान न पेलून घ्यावे
ज्ञान, अस्त्रांनीच निश्चित विजय जीवन संगरी ॥ ५ ॥